**आकाशवाणी नागपूर,**
**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**
**मंगळवार दिनांक ११ नोव्हेंबर २०२५**

**ठळक बातम्या**

1. **दिल्लीत लाल किल्ला परिसरात स्फोट घडवून आणणाऱ्या दोषींवर कठोर कारवाई केली जाईल, असा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा इशारा; केंद्रीय गृहमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय बैठक.**
2. **"जल संचय जनभागीदारी 1.0 (JSJB)" पुरस्कारांमध्ये महाराष्ट्रान पटकावला देशात प्रथम क्रमांक.**
3. **राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत नागपूर, नाशिक आणि धाराशिव जिल्हा मध्यवर्ती बँकांना भागभांडवल म्हणून ८२७ कोटी रुपये देण्यास आज मान्यता.**

**आणि**

4. **इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी, नागपूरचा पाचवा दीक्षांत समारंभ संपन्न.**

**आता सविस्तर बातम्या .......**

**दिल्ली स्फोट**

दिल्लीत लाल किल्ला परिसरात स्फोट घडवून आणणाऱ्या दोषींवर अत्यंत कठोर कायदेशीर कारवाई केली जाईल, असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज सांगितलं. भूतान इथं एका कार्यक्रमात ते बोलत होते. काल रात्रीपासून स्फोटाचा तपास करणाऱ्या यंत्रणांकडून सातत्यानं माहिती घेत असून या स्फोटामागच्या खऱ्या सुत्रधाराला तपास यंत्रणा शोधून काढतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. संपूर्ण देश स्फोटात मृत्युमुखी पडलेल्यांच्या कुटुंबियांसोबत असल्याचं मोदी यांनी सांगितलं.

***आज मैं यहाँ बहुत भारी मन से आया हूँ। कल शाम दिल्ली में हुई भयावह घटना ने सभी के मन को व्यथित कर दिया है। मैं पीड़ित परिवारों का दुख समझता हूँ। आज पूरा देश उनके साथ खड़ा है। मैं कल रात भर इस घटना की जांच में जुटी सभी एजेंसियों के साथ।सभी महत्वपूर्ण लोगों के साथ संपर्क में था। विचार विमर्श चलता था, जानकारीयों के तार जोड़े जा रहे थे। हमारी एजेंसियां इस षड़यंत्र कि तह तक जाएंगी। इसके पीछे के षड्यंत्रकारियों को बख्शा नहीं जाएगा।***

लाल किल्ला इथल्या स्फोटानंतर परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय बैठक झाली. शहा यांच्या निवासस्थानी झालेल्या या बैठकीला केंद्रीय गृह सचिव, गुप्तचर विभागाचे प्रमुख, दिल्ली पोलिस आयुक्त, राष्ट्रीय तपास संस्थेचे महासंचालक उपस्थित होते. जम्मू आणि काश्मिरचे पोलीस महासंचालक या बैठकीला दूरस्थ पद्धतीनं उपस्थित होते. लाल किल्ला मेट्रो स्थानकाजवळ एका गाडीत काल संध्याकाळी सातच्या सुमारास एक शक्तीशाली स्फोट झाला. या दुर्घटनेत आठ जणांचा मृत्यू झाला तर अनेक जण जखमी झाले आहेत. स्फोटानंतर तातडीनं दिल्ली पोलीस, NIA, NSG तसंच न्यायवैद्यकीय पथकांनी तपास सुरू केल्याची माहिती गृहमंत्री अमित शहा यांनी दिली. शहा यांनी काल रुग्णालयात जाऊन स्फोटातील जखमींची भेट घेतली. दरम्यान, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी या हल्ल्याची निंदा केली आहे..

***ये बहुत ही दुर्भाग्यपूर्ण घटना है। सरकार ने बहुत गंभीरता से इसको लिया है और हमारी सरकार इस प्रकार की कृति करने वाले लोगों के खिलाफ़ कड़ी कार्रवाई करेगी और आतंकवाद को और आतंकवाद को समर्थन करने वालों को इस देश में कोई जगह नहीं है। इस रूप से सब लोगों ने उनका धिक्कार करना चाहिए।***

**जल संचय जनभागीदारी**

जलशक्ती मंत्रालयाने जाहीर केलेल्या “जल संचय जनभागीदारी 1.0 (JSJB)” पुरस्कारांमध्ये महाराष्ट्राने देशात प्रथम क्रमांक पटकावला आहे. या उपक्रमात राज्याने पाणी साठवण, पुनर्भरण आणि शाश्वत जलव्यवस्थापनाच्या क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केली आहे.हा उपक्रम “जलशक्ती अभियान - कैच द रेन” अंतर्गत राबवण्यात आला असून, २०२५ सालचे पुरस्कार राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते १८ नोव्हेंबर २०२५ रोजी नवी दिल्लीतील विज्ञान भवन येथे प्रदान केले जाणार आहेत.महाराष्ट्रासह देशभरातील एकूण १०० पुरस्कार विजेते जाहीर करण्यात आले आहेत, ज्यात ३ राज्ये, ६७ जिल्हे, ६ महानगरपालिका, २ उद्योग, ३ स्वयंसेवी संस्था आणि १४ नोडल अधिकारी यांचा समावेश आहे.राज्यातील विविध जिल्ह्यांनी कृत्रिम जलसंचय, तलाव व पाणवठ्यांचे पुनरुज्जीवन आणि पावसाच्या पाण्याचे संकलन यात लक्षणीय यश मिळवले आहे. या उल्लेखनीय कामगिरीमुळे महाराष्ट्राने जलसंवर्धनात देशात आघाडी घेतली आहे.

**धावपट्टीच्या विस्तारीकरण**

अकोल्यातील शिवणी विमानतळाच्या धावपट्टीच्या विस्तारीकरणाला अखेर हिरवा कंदील मिळाला आहे. राज्य शासनाने या कामासाठी तब्बल ₹२०९ कोटींची मंजुरी दिली असून, सोमवारी याबाबतचा अधिकृत आदेश जारी करण्यात आला. शिवणी विमानतळाचा प्रश्न अनेक वर्षांपासून प्रलंबित होता. धावपट्टी विस्तारीकरणासाठी आवश्यक जमीन अधिग्रहणाच्या प्रक्रियेत झालेल्या विलंबामुळे विमानतळ प्रकल्प ठप्प अवस्थेत होता. दरम्यान अकोल्यातील लोकप्रतिनिधींनी हा विषय शासनाकडे पाठपुरावा करुन सोडविला. या निर्णयानंतर अकोल्यात आनंदाचे वातावरण आहे.

**आत्मसमर्पण**

राज्य सरकारच्या नक्षल आत्मसमर्पण योजनेला प्रतिसाद देत जहाल नक्षलवादी, आणि दलम सदस्य कोसा मंगलू उईका, उर्फ वर्गेश यानं काल गोंदिया पोलिसांपुढं आत्मसमर्पण केलं. लहानपणापासूनच तो नक्षलवादी चळवळीत सक्रिय होता. त्याच्यावर साडेतीन लाख रुपयांचं बक्षीस होतं. माओवादी संघटनेत होणारा त्रास आणि अत्याचाराला कंटाळून वर्गेशनं आत्मसमर्पण केल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

**भूमि अभिलेख परीक्षा**

भूमि अभिलेख विभागातील गट क पदसमूह-4 (भूकरमापक) संवर्गातील रिक्त पदांसाठी 13 आणि 14 नोव्हेंबर 2025 रोजी ऑनलाइन परीक्षा घेण्यात येणार आहे. या परीक्षेचे विभागनिहाय वेळापत्रक आणि प्रवेशपत्राची लिंक विभागाच्या https://mahabhumi.gov.in या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध असेल, अशी माहिती जमाबंदी आयुक्त आणि भूमि अभिलेख संचालक डॉ. सुहास दिवसे यांनी दिली.पहिल्या दिवशी 13 नोव्हेंबरला पुणे आणि अमरावती विभागात सकाळी 8 वाजता, तसेच नाशिक आणि नागपूर विभागात दुपारी 12 वाजता परीक्षा होणार आहे. दुसऱ्या दिवशी 14 नोव्हेंबरला मुंबई (कोकण) विभागात सकाळी 8 वाजता आणि छत्रपती संभाजीनगर विभागात दुपारी 12 वाजता परीक्षा होईल.

**अकोला निर्णय**

आपल्या ११ सप्टेंबर २०२५ च्या निर्णयावर सर्वोच्च नायायालयाने आज स्थगिती दिली आहे. सप्टेंबर महिन्यातील निर्णयात २०२३ मधील अकोला दंगलीच्या

चौकशीसाठी गठीत एसआयटीमध्ये हिंदू आणि मुस्लिम समुदायातील वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांचा समावेश करावा, असे निर्देश देण्यात आले होते. सरन्यायाधीश न्या. भूषण गवई, न्यायमूर्ती विनोद चंद्रन आणि एन.व्ही. अंजनिया यांच्या खंडपीठाने हा आदेश दिला. यापूर्वी ७ नोव्हेंबरला या निर्णयावरील पुनर्विचार याचिकेवर खंडपीठात मतभेद झाल्याने प्रकरण मोठ्या खंडपीठाकडे वर्ग करण्यात आले होते. राज्य सरकारने युक्तिवाद केला होता की धार्मिक ओळखीच्या आधारे पोलिसांची नियुक्ती करणे हे संविधानातील धर्मनिरपेक्षतेच्या तत्वांना बाधा आणणारे आहे. या पार्श्वभूमीवर सध्या संबंधित निर्णयाची अंमलबजावणी स्थगित ठेवण्याचा आदेश देण्यात आला आहे.

**राज्य मंत्रिमंडळ निर्णय**

राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत नागपूर, नाशिक आणि धाराशिव जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांना एकूण ८२७ कोटी रुपयांचे शासकीय भागभांडवल मंजूर करण्यात आले.यामध्ये नागपूर जिल्हा बँकेला ८१ कोटी रुपये मिळणार असून, ग्रामीण भागातील वित्तपुरवठा आणि पीककर्ज वितरणाला यामुळे गती मिळेल.या निर्णयामुळे जिल्हा बँकांच्या पुनर्भांडवलीकरणाला चालना मिळून सहकारी संस्थांची आर्थिक स्थिती मजबूत होण्यास मदत होईल.याशिवाय न्यायालयीन संकुले आणि न्यायाधीशांच्या निवासस्थानांच्या सुरक्षेसाठी महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळामार्फत अतिरिक्त सुरक्षारक्षक उपलब्ध करून देण्यासही मान्यता देण्यात आली. तसेच पाचव्या महाराष्ट्र वित्त आयोगाच्या अहवालाच्या अंमलबजावणीचा कालावधी वाढवून १ एप्रिल २०२५ ते ३१ मार्च २०२६ पर्यंत ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला.

**मनपा आरक्षण सोडत**

नागपूर महानगरपालिकेच्या सन २०२५ मध्ये होणाऱ्या सार्वत्रिक निवडणुकीच्या अनुषंगाने अनुसूचित जाती (महिला), अनुसूचित जमाती (महिला), नागरीकांचा मागासवर्ग प्रवर्ग (महिला) तसेच सर्वसाधारण महिला या वर्गांसाठी आरक्षण निश्चित करण्याची आज सोडत काढण्यात आली. महानगरपालिकेतील ३८ प्रभागातील विविध प्रवर्गातील एकूण १५१ जागांपैकी ७६ जागा महिलांसाठी राखीव झाल्या आहेत.नागपूर महानगरपालिकेत एकूण १५१ जागांपैकी अनुसूचित जातीच्या प्रवर्गासाठी ३० जागा राखीव आहेत. त्यापैकी १५ जागा महिलांसाठी राखीव झाल्या. अनुसूचित जमातीसाठी एकूण १२ जागा राखीव आहेत. त्यापैकी ६ जागा महिलांना राखीव झाल्या.

नागरिकांचा मागास प्रवर्गासाठी एकूण ४० जागा राखीव आहेत. त्यापैकी २० जागा महिलांसाठी राखीव झाल्या आहेत. उर्वरित ६९ सर्वसाधारण मतदारसंघातील जागांपैकी ३५ जागा महिलांसाठी राखीव करण्यात आलेल्या आहेत.

**प्रभाग आरक्षणाची सोडत**

चंद्रपूर महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी प्रभाग आरक्षणाची सोडत आज दिनांक ११ नोव्हेंबर २०२५ रोजी पार पडली. या सोडतीत अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नागरिकांचा मागास प्रवर्ग तसेच सर्वसाधारण प्रवर्गातील आरक्षण निश्चित करण्यात आले असून, महिलांसाठी एकूण ३३ जागा आरक्षित करण्यात आल्या आहेत.

**नामनिर्देशनपत्र सादर**

नगर परिषदेच्या निवडणुकीसाठी नामनिर्देशनपत्र सादर करण्याच्या आजच्या दुसऱ्या दिवशी ३ नगर परिषदांमध्ये एकाही उमेदवाराने नामनिर्देशनपत्र दाखल केले नाही. गडचिरोली जिल्ह्यात गडचिरोली, देसाईगंज व आरमोरी या तीन नगर परिषदा आहेत. आज नामनिर्देशनपत्र दाखल करण्याचा दुसरा दिवस होता. परंतु एकाही उमेदवाराने अर्ज सादर केला नाही.

**आयआयआयटीएन**

इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी, नागपूर (आयआयआयटीएन)चा पाचवा दीक्षांत समारंभ व्हीएनआयटी, नागपूर इथं मोठ्या उत्साहात पार पडला. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे एआयसीटीईचे अध्यक्ष प्रा. टी. जी. सीताराम होते, तर गव्हर्नर्स मंडळाचे अध्यक्ष दीपक घैसास अध्यक्षस्थानी होते. या समारंभात ४३१ विद्यार्थ्यांना पदव्या प्रदान करण्यात आल्या, ज्यात ८ पीएच.डी., २५ एम.टेक, ६९ पीजी डिप्लोमा आणि ३२९ बी.टेक पदव्या होत्या. “अवॉर्ड ऑफ मेरिट” कंप्युटर सायन्स शाखेतील जोहान मायकेल (CGPA ९.६२) आणि ईसीई शाखेतील गुरुवेल्ली चैत्रा (CGPA ९.१९) यांना देण्यात आला, तर सर्वोच्च “इन्स्टिट्यूट एक्सलन्स अवॉर्ड” जोहान मायकेल यांना मिळाला. प्रा.सीताराम यांनी विद्यार्थ्यांना नवोपक्रमशील, जबाबदार राष्ट्रनिर्माते बनण्याचे आवाहन केले, तर दीपक घैसास यांनी तांत्रिक उत्कृष्टतेसोबत सामाजिक जबाबदारी जोपासण्याचा संदेश दिला. कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने झाली.

*****